Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10(I)| October- 2025

Original Article

शाश्वत विकास साधताना वाणिज्य क्षेत्राची महत्त्वाची भूमिका: एक अध्ययन

राजेंद्र नंदराव मालेकर
Dr. Khatri Mahavidyalaya Tukum, Chandrapur Gondwana University, Gadchiroli Maharashtra. Indian
Email- rmalekar1990@gmail.com

Manuscript ID:
JRD -2025-171004
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 10(I)
Pp. 24-28
October 2025
Submitted: 10 Sept. 2025
Revised: 20 Sept. 2025
Accepted: 05 Oct. 2025
Published: 31 Oct. 2025

सारांश :-

पर्यावरण आणि मानव यांचा अगदी जवळचा संबंध आहे. कोणत्याही प्रकारचा विकास किंवा बदल करायचा असेल तर या घटकाशिवाय शक्य होणार नाही. त्यामुळे या घटकांना खूप महत्त्वाचे मानले जाते.म्हणूनच पर्यावरणामध्ये शाश्वत विकास होत राहणे आवश्यक आहे. हा होणारा विकास दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी पर्यावरणामध्ये होणारे बदल आणि मानवी जीवनामध्ये आवश्यक असणारे बदल यामधून मानवाच्या पूर्ण होणाऱ्या गरजा जसे वस्तू आणि सेवांची आवश्यकता भासत असते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनामध्ये पर्यावरणाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा सर्व क्षेत्रात विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. हा विकास साधण्यासाठी वाणिज्य क्षेत्राचा महत्वाचा वाटा असताना दिसून येते. पर्यावरण आणि मानव यांच्यात समन्वय साधन्याची महत्त्वाची भूमिका वाणिज्य क्षेत्रात बजावताना दिसून येते आहे.

कीवर्ड :- पर्यावरण, मानव ,विपरीत परिणाम, समन्वय.

प्रस्तावना :

मानवी जीवनात दीर्घकाळ टिकून राहणारी अवस्था म्हणजे शाश्वत विकास होईल. शाश्वत विकास ही एक संकल्पना असून दीर्घकाळ टिकून राहणारा विकास आहे. सर्वप्रथम शाश्वत विकासाची चिरकाल टिकणारा विकास ही संकल्पना ब्रुटलँड समितीने सन १९८७ साली संकल्पना वापरली. भविष्यामध्ये होणारा विकास हा सध्याचा विकास मानला जातो ही संकल्पना महत्त्वाची आहे. वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी पैशाचा वापर करणारा कोणत्याही व्यवहार हा वाणिज्य क्षेत्रातील एक भाग आहे. आधुनिक वाणिज्य पद्धती शाश्वतेशी सुसंगत असुन होणारा संसाधनाचा अतिवापर आणि अल्पकालीन व्यवसाय धोरणामुळे दीर्घकालीन धोके निर्माण होऊ शकतात उदा. अस्थिर बाजारपेठ, संसाधनावर संकट आणि पर्यावरणीय आपत्ती. वाणिज्य क्षेत्रामध्ये सामाजिक जबाबदारी,नैतिक संसाधनाचा वापर आणि विविध साधनांचा एकत्रीकरण करणे म्हणजे शाश्वत विकास होय. शाश्वत विकास साधत असताना वाणिज्य क्षेत्राचा संबंध महत्त्वाचा आहे. शाश्वत विकासामधीलच एक भाग हा वाणिज्य आहे म्हणूनच व्यवसाय करताना पर्यावरणाची काळजी घेणे आपले महत्त्वाचे कर्तव्य आहे. यासाठी व्यवसायाने पर्यावरणाची काळजी घेणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे, सामाजिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
राजेंद्र नंदराव मालेकर

How to cite this article:
राजेंद्र नंदराव मालेकर,(2025). 'शाश्वत विकास साधताना वाणिज्य क्षेत्राची महत्त्वाची भूमिका : एक अध्ययन, Journal of Research & Development, 17(10(I)), 24-28

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
OPEN ACCESS

संशोधनाचा उद्देश :-

१) नैसर्गिक संसाधनाचा अभ्यास करणे.

२) शाश्वत विकास काय आहे ते समजून घेणे.

३) शाश्वत विकासासाठी वाणिज्य क्षेत्रामध्ये काय संबंध आहे याचा अभ्यास करणे.

४) शाश्वत विकास व वाणिज्य क्षेत्र यांचे काय संबंध आहे यावर प्रकाश टाकणे.

संशोधकाची गृहितके :-

१) पर्यावरणीय सामाजिक आर्थिक संतुलन साधने.

२) नैसर्गिक साधनाचे योग्य ते जतन करणे.

३) मानवी जीवनात शाश्वत विकास समजून घेणे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन निबंध लिहिण्याकरता दुय्यम स्वरूपाची माहिती संकलित करून त्या माहितीचा अभ्यास करण्यात आला. संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ, ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, संशोधन लेख, इंटरनेट, इत्यादी द्वितीय साधनाचा वापर करण्यात आला.

शाश्वत विकासात वाणिज्य क्षेत्राची भूमिका :-

शाश्वत विकास साधण्यासाठी वाणिज्य क्षेत्र महत्त्वाचे आहे कारण त्यामुळे आर्थिक वाढ, सामाजिक समानता आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत करते. संसाधनाचा वापर करताना आणि नैसर्गिक पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभाव कमी करण्यास प्रोत्साहित करण्याचे महत्त्वाची भूमिका वाणिज्य क्षेत्र पार पाडताना दिसून येत.

१) आर्थिक विकास :-

व्यवसायाची आर्थिक स्थिती आणि सामाजिक स्थिती सुनिश्चित करणे आवश्यक असते त्याकरिता नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन कल्पना, नवीन बाजारपेठेचा विकास करणे आणि आर्थिक वाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करून योग्य प्रकारचे गुंतवणूक करणे आवश्यक असते त्यामुळे नवीन व्यवसाय आणि नोकरीची निर्मिती करणे सोपे जाते.

२) सामाजिक जबाबदारी :-

व्यवसायाची कामगिरी बजावीतअसताना कामगारांसाठी चांगले वेतन ,कामाची सुरक्षितता, योग्य परिस्थिती, कामगाराचे शिक्षण ,आरोग्य, गुंतवणूक करणे ,त्यांच्यामध्ये समन्वय साधने आवश्यक असते. चांगले जीवन जगताना सामाजिक न्याय निश्चित करणे.

३) उद्योग आणि व्यापार :-

पर्यावरण पूरक उत्पादन करीत असताना उद्योगाने वापरण्यात येणारे उत्पादन व ग्रीक टेक्नॉलॉजीचा वापर कचरा व्यवस्थापन, पुन:वापर , नवीनीकरण ऊर्जेचा अवलंब. वाणिज्य क्षेत्रातील विविध सेवा व उद्योग रोजगार निर्माण करणे, त्यामुळे आर्थिक शाश्वतता प्राप्त होण्यास मदत होते.

४) पर्यावरण संरक्षण :-

कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करीत असताना पर्यावरणाचे संरक्षण करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे . व्यवसाय करत असताना व्यवसाय कमी प्रदूषण करावे, निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन आणि नैसर्गिक संसाधनाचा कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे. वस्तू आणि सेवांचा होणारा आंतरराष्ट्रीय वापर व्यापारातून सकारात्मक दृष्टिकोनातून करणे गरजेचे. व्यवसायामध्ये होणारा ऊर्जा स्त्रोतांचा वापर आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्राचा वापर करीत असताना पर्यावरणाचा संरक्षण करून अशा पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

५) वित्तीय व बँकिंग सेवा :-

विविध प्रकारच्या व्यवसायांना कर्जाची पुरवठा करण्यासाठी बँक मोठ्या प्रमाणात मदत करीत असते. किंवा अशा व्यवहारात होणाऱ्या विविध प्रकारच्या कागदांचा उपयोग कमी करण्यात यावा. व्यवसायामध्ये पर्यावरण पूरक व्यवस्थापन,लघुउद्योग आणि ग्रामीण उद्योगांचे जागतिक बाजारात, ई-कॉमर्स, डिजिटल यांचे महत्त्व अधिक प्रमाणात आले आहे.

६)उपभोग आणि उत्पादन :-

शाश्वत टिकाऊ व्यवसाय पद्धतीचा अवलंबून, वाणिज्य नैसर्गिक आणि सामाजिक संसाधनांचा ऱ्हास न होता उपभोग आणि उत्पादनाचा वापर करने गरजेचे आहे.

७) सामाजिक भांडवलाचा वापर :-

व्यवसाय करीत असताना नैसर्गिक आणि सामाजिक भांडवलाचा वापर करून आर्थिक विकास होण्याकरिता शाश्वत विकास परिणामकारकता आणि सामाजिक कल्याण साध्य करण्यास महत्त्वाची भूमिका बजावते.

८)नवीन रोजगार आणि नवकल्पना :-

शाश्वत विकासाला चालना देऊन वाणिज्य क्षेत्रात नवीन रोजगार संधी निर्माण करून नवनवीन रोजगार निर्माण करणे आणि पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञान व नवकल्पनांना प्रोत्साहन देते.

९)गरिबी निर्मूलन आणि समानता :-

व्यवसाय करीत असताना शाश्वत विकासाद्वारे वाणिज्य क्षेत्रात गरिबीचे उच्चाटन करून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधरवण्याकरिता मदत करण्यास आणि समाजात आर्थिक समानता निर्माण करण्यासाठी मदत करते.

१०)पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञान :-

व्यवसायात विविध प्रकारचा व्यवसाय करीत असताना पर्यावरणास अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषण कमी करावे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर करून, वाणिज्य धोरणे सुचवतात व्यवसाय करण्यात यावा.

शाश्वत विकासासाठी वाणिज्य क्षेत्राचे योगदान :-

१) नवीन तंत्रज्ञान :-

उद्योग व्यवसाय करीत असताना वेगवेगळया तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता नवकल्पनामध्ये गुंतवणूक करण्याकरता शाश्वत विकासाच्या आधारे वाणिज्य क्षेत्रामध्ये सकारात्मक बदल घडून आलेला दिसून.त्यामुळे कमी खर्चात अधिक नफा होण्यास मदत होते.

२) जागरूकता आणि शिक्षण :-

विविध प्रकारच्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधील आणि ग्राहकांमध्ये शाश्वत जीवनशैली आणि वापरण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या उपयोगी वस्तू यामध्ये जागरूकता निर्माण करून व्यवसायाबद्दल आणि उद्योगाबद्दल जागरूकता वाढवून देण्याचे काम या वाणिज्य क्षेत्रामध्ये करण्यात आले.

३) भागीदारी आणि सहयोग :-

सामाजिक संस्था आणि इतर व्यवसायिक संस्थेसोबत भागीदारी करून शाश्वत विकासासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्यासाठी मदत झाली त्यामुळे विविध प्रकारच्या कंपन्यांमध्ये सहकार्य लाभलं आणि व्यवसाय करण्याकरीत अंमलबजावणी करण्यात मदत झाली.

४) पर्यावरणीय व्यवस्थापन :-

व्यवसाय क्षेत्रामध्ये काम करत असताना विविध कंपन्यामध्ये होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करतात, वातावरणातील हरितगृह वायूचे उत्सर्जन कमिकरण्यात आणि अक्षय ऊर्जा स्त्रोतांमध्ये गुंतवणूक करन्यास मदत होते.

५)सामाजिक जबाबदारी :-

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) कार्यक्रमांद्वारे आणि वकिलीद्वारे शाश्वत धोरणे आणि उपक्रमांना समर्थन दिले जाते, ज्यामुळे समुदायाचे कल्याण होते.

६)शाश्वत साहित्य आणि प्रक्रियांचा वापर :-

कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करीत असताना नैसर्गिक संसाधनांचा कोणताही ऱ्हास न करता आणि पर्यावरणाला कोणत्तीही हानी न पोहोचवता व्यावसायिक क्रियाकलाप केले जातात.

७)धोरणात्मक व्यवस्थापन :-

वाणिज्य क्षेत्रात शाश्वत विकासाला धोरणात्मक व्यवस्थापन, पर्यावरणीय धोरण आणि आर्थिक विकासाशी जोडते, जेणेकरून सर्वांगीण प्रगती साधता येईल.

८) कर्मचारी प्रशिक्षण :-

विविध कंपन्या काम करताना आपल्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यासाठी कर्मचारी करीता प्रशिक्षित देण्यात येऊन त्यांना काम करताना संस्थेमध्ये आणि समाजात प्रत्येकात सकारात्मक बदल करता यावा.

९) दीर्घकालीन आर्थिक स्थिरता :-

शाश्वत व्यवसाय दीर्घकालीन वाढ साधतात, ज्यामुळे आर्थिक व्यवहार्यता सुनिश्चित होते आणि संसाधनांचा वापर जबाबदारीने होतो.

शाश्वत विकासातील आव्हाने :-

१) आर्थिक आणि सामाजिक अडथळे:

निर्माण होणारी गरिबी, ग्रामीण व शहरी भागात वाढती सामाजिक-आर्थिक असमानता आणि मर्यादित शिक्षण, आरोग्य सेवा व तंत्रज्ञानाचा अभाव अशा विविध प्रकारच्या शाश्वत विकासाच्या मार्गातील मोठे अडथळे निर्माण होत आहे.

२) नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर :-

जंगलतोड, अधिवास नष्ट होणे आणि संसाधनांचा मोठ्या प्रमाणात होणारा ऱ्हास हे शाश्वत विकासासमोरच्या गंभीर समस्या आहेत, कारण नैसर्गिक संसाधनांचा साठा मर्यादित असला तरी वापर मात्र अमर्यादित स्वरूपाचाआहे.

३) पर्यावरणाचे संरक्षण :-

वातावरणात होणारे प्रदूषण, हवामानात बदल आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी शाश्वत धोरणे आणि पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

४) अस्थिर उत्पादन पद्धती :-

माणसाच्या निर्माण होणाऱ्या गरजा ह्या अमर्यादित असल्या तरी व्यवसायामध्ये निर्माण करणारे उत्पादन पद्धती मात्र मर्यादित स्वरूपाच्या जसे अन्न, ऊर्जा आणि इतर वस्तूंचे अस्थिर उत्पादन आणि वापराच्या पद्धती पर्यावरणावर मोठा अवलंबून असते त्यामुळे व्यवसायात ताण निर्माण होताना दिसते.

५) जागरूकतेचा अभाव :-

शाश्वत विकासाच्या महत्त्वाविषयी लोकांमध्ये आणि धोरणकर्त्यांमध्ये पुरेशी जागरूकता नसल्यामुळे या दिशेने काम करणे कठीण होत याचे प्रमुख कारक म्हणजे लोकांमध्ये जनजागृती नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होते..

शाश्वत विकासासाठी आवश्यक उपाययोजना :-

१) आर्थिक-सामाजिक संतुलनावर भर :- समाजामध्ये निर्माण होणारे विविध प्रकारचे सामाजिक संतुलनावर भर पडतातगरिबी कमी करणे, सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि सामाजिक-आर्थिक विषमतेवर तोडगा काढणे.

२) पर्यावरणपूरक धोरणे :- नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, प्रदूषण कमी करणे आणि शाश्वत उत्पादन व वापराच्या पद्धतींना प्रोत्साहन देणे.

३) तंत्रज्ञानाचा योग्य वापर : - शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे, ज्यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर होईल आणि पर्यावरणपूरक उपाय शोधता येतील

४)जागतिक सहकार्य : - हवामान बदल आणि इतर जागतिक समस्यांवर मात करण्यासाठी कंपन्या, सरकार आणि समुदायांनी एकत्रितपणे काम करणे.

५) विकासाच्या पारंपरिक मॉडेलमध्ये बदल :- सध्याच्या विकास पद्धतींमध्ये सुधारणा करून पर्यायी आणि अधिक शाश्वत दृष्टिकोन स्वीकारणे.

निष्कर्ष :-

शाश्वत विकासासाठी वाणिज्य क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे कंपनीची शाश्वत पद्धतीचा अवलंब केल्यास ते पर्यावरणाची काळजी घेऊ शकतात सामाजिक विकास साधू शकतात आणि आर्थिक दृष्ट्या यशस्वी होऊ शकतात. व्यवसायाने शाश्वत विकास धोरण

स्वीकारण्यास ते समाजाला, पर्यावरणाला मदत करू शकतात .शाश्वत विकास हा एक सामाजिक दृष्टिकोन आहे. वाणिज्य क्षेत्रातील शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जुळवून घेऊन, पर्यावरणास व समाजामध्ये तसेच अर्थव्यवस्थेमध्ये सकारात्मक योगदान देऊ शकते.

संदर्भसूची :-

1) https://en.wikipedia.org

2) https://sdg.un.org

3) https://www.vedantu.com

4) marathivishwakosh.org

5) पर्यावरण आणि शाश्वत विकास डॉ. अशोक गायकवाड